# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

प्रवेश सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/८६५
दिनांक : 09 AUG 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन Registration & Documents verification, confirmation of Application Form for Admission to Seats other than CAP Seats साठी मुदतवाढ देणेबाबत आणि प्रवेशाची कट ऑफ डेट दिनांक १४.८.२०१७ ऐवजी ३१.८.२०१७ अशी वाढविण्याबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कट ऑफ डेट दिनांक १४.८.२०१७ अशी निर्धारीत करण्यात आली आहे. दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालय , नवी दिल्ली येथे दाखल झालेल्या M.A.३९१/२०१७ न्यायालयीन प्रकरणी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेशाची कट ऑफ डेट दिनांक ३१.८.२०१७ पर्यंत वाढविण्यास मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने संस्थास्तरावर तसेच अगेन्सट कॅप करिता प्रवेशासाठी कागदपत्रे पडताळणी करून नोंदणी करू शकले नाहीत किंवा इयत्ता बारावी मध्ये अनुत्तीर्ण झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या पुनर्परीक्षेअंती आता पात्र होणा-या उमेदवारांना प्रवेशाची संधी मिळावी म्हणून अशा सर्व उमेदवारांसाठी Registration & Documents verification, confirmation of Application Form for Admission to Seats other than CAP Seats करिता दिनांक २४.८.२०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच वरील अभ्यासक्रमांना प्रथम वर्ष प्रवेशासाठीची कट ऑफ दिनांक १४.८.२०१७ ऐवजी ३१.८.२०१७ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार, पालक , संस्था आणि इतर सर्व संबंधित घटकांनी वरील बदलाची नोंद घ्यावी.

( दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सादर
मा.अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
प्रत : १.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर , त्यांना कळविण्यात येते की, वरील बाब आपल्या अधिनस्त असलेलया सर्व व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणावी व आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरसुध्दा प्रदर्शित करावी.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१७/ 1895
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 10-08-17

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- १) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी.पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.